|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon - 425001

"A" Grade NAAC Re-accredited (3rd Cycle)

जा.क्र.कबचौ उमावि/५/नविन महा.-प्रथम संलग्नि.मान्यता-२०१९-२०/ 9/ 274/२०१९

दिनांक : 17-07-2019

प्रति,

मा. अध्यक्ष / संचालक
श्रम साधना बॉम्बे
हॉस्टेल फॉर वर्किंग वुमन, कार्डिनल ग्रेशस हायस्कुल समोर बान्द्रा (पुर्व) मुंबई.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून नविन महाविद्यालयाच्या प्रथम संलग्नतेच्या मान्यतेबाबत

संदर्भ :- १) शासन निर्णय क्रमांक एनजीसी-२०१७/(२९/१७)/मशि-४ दिनांक १५.०९.२०१७
२) शासन निर्णय क्रमांक मान्यता / २०१९ / (१३३/१९) / मशि-४ दिनांक १५.०६.२०१९
३) शासन शुद्धीपत्रक क्रमांक मान्यता / २०१९/ (१३३/१९) / मशि-४ दिनांक १९.०६.२०१९
४) विद्यापीठाचे पत्र क्र. कबचौ उमवि/५/FTA LIC १९-२०/D.O. 9 / 228 /२०१९, दि. 05-07-2019

महोदय/महोदया,

शासनाने उपरोक्त संदर्भिय क्र. ०२ व ०३ च्या शासन निर्णयानुसार आपल्या संस्थेस शैक्षणिक वर्ष - २०१९-२० पासून नवीन महाविद्यालय सुरु करणेस दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने आपल्या प्रस्तावीत महाविद्यालयाची तपासणी करुन अहवाल सादर करण्यासाठी विद्यापीठाद्वारा, प्राप्त आदेशान्वये, संदर्भिय पत्र क्रमांक ०४ अन्वये स्थानिक चौकशी समितीची नियुक्ती करण्यात आली होती.सदर समितीने आपल्या महाविद्यालयास भेट देवून त्याबाबतचा अहवाल विद्यापीठास सादर केलेला असून सदरच्या स्थानिक चौकशी समितीच्या अहवालास मा.विद्या परिषदेच्या वतीने मा.कुलगुरु महोदयांनी मान्यता प्रदान केलेली आहे.

तरी उपरोक्त अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, स्थानिक चौकशी समितीने त्यांच्या अहवालात नमूद केलेल्या अटी/त्रुटींची मागील तज्ञ समितीने त्यांचे अहवालात नमूद केलेल्या अटी/त्रुटींची,विद्यापीठाच्या दिनांक २१/०४/२०१९ रोजीच्या पत्रातील आणी त्यासोबत जोडलेल्या टेबल-ए मध्ये नमूद केलेल्या बाबींची,तसेच आपणांस ज्या शासन निर्णयान्वये नवीन महाविद्यालय सुरु करणेस मान्यता प्रदान करण्यांत आलेली आहे त्या शासन निर्णयातिल अटी/त्रुटींची तीन महिन्याच्या आंत पूर्तता करुन विद्यापीठाच्या संलग्नता विभागास अटी पूर्तता अहवाल सादर करण्याच्या अटींवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ चे कलम ११० नुसार सोबत जोडलेल्या तक्त्यात नमूद करण्यांत आलेल्या विद्याशाखा व त्यात नमूद केलेल्या विषय/अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून प्रथम संलग्नता प्रदान करण्यात येत आहे <u>आपणांस मान्य केलेल्या विद्यार्थी संख्येएवढेच विद्यार्थी शासन प्रवेश प्रक्रियेनुसार प्रवेशीत करावेत ही विनंती.</u> आपणांस देण्यांत येत असलेली मान्यता ही शैक्षणिक वर्ष २०१९-२० या एका वर्षाकरीता राहील व सदर मान्यतेचे वेळोवेळी नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार करुन घेणे बंधनकारक असून,संलग्नीकरणाच्या नुतनीकरणासाठी आपण दरवर्षी ऑगस्ट महिन्यात त्याबाबतचा प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी. आपणांस विदीत करण्यांत येते की, आपण आपल्या महाविद्यालयात/परिसंस्थेत परिनियम ४१५ (१) नुसार कार्यभारानुसार आवश्यक तेवढ्या नियमित शिक्षकांची नियुक्ती करुन सदर नियुक्तीचे प्रस्ताव विद्यापीठाच्या व्याख्याता मान्यता विभागास सादर करुन त्यास विद्यापीठाची त्वरीत मान्यता घेण्यांत यावी.त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या अध्यादेश १७२(ई) मध्ये नमूद केलेले विविध फंड्स तयार करुन त्याबाबतच्या ठेवी राष्ट्रीयकृत बँकेत ठेवण्यांत याव्यात व त्यांच्या साक्षांकित प्रती विद्यापीठास अटी-पूर्तता अहवालासोबत सादर कराव्यात.

Inward No. 01
Date 17 JUL 2019

<u>महाविद्यालयाचे नांव :-</u>

[NW65378] - SHRAM SADHANA BOMBAY TRUST KALA, WANIJYA VA VIDNYAN MAHAVIDYALAYA - BAMBHORI

| Sr. No. | Name of Sanstha | Name of College | Place | Faculty & Courses/Subjects Granted by the Government | Conditions to be fulfilled by the College |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1. | SHRAM SADHANA BOMBAY Bandra(E), Mumbai | [NW65378] - SHRAM SADHANA BOMBAY TRUST KALA, WANIJYA VA VIDNYAN - MAHAVIDYALAYA BAMBHORI | BAMBHORI | ARTS - B.A. [COMPUTER APPLICATION, PUBLIC ADMINISTRATION, PSYCHOLOGY, ECONOMICS, SOCIOLOGY, POLITICAL SCIENCE, GEOGRAPHY, | 1)ALL CONDITIONS ARE FULFILLED 2)NIL |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | HISTORY, COMPULSORY ENGLISH, OPT.ENGLISH, COMPUTER KNOWLEDGE & APPLICATION, ENVIRONMENT.] - 120<br>SCIENCE - B.SC. [COMPUTER SCIENCE, MICROBIOLOGY, MATHEMATICS, PHYSICS, BIOCHEMISTRY, CHEMISTRY, ELECTRONICS SCIENCE, GEOGRAPHY,] - 120<br>COMMERCE AND MANAGEMENT - B.B.A. [ALL COMPULSORY SUBJECT] - 60<br>COMMERCE AND MANAGEMENT - B.C.A. [ALL COMPULSORY SUBJECT] - 60<br>COMMERCE AND MANAGEMENT - B.COM.[ALL COMPULSORY SUBJECT] - 120 | |

वरील तक्त्यातील रकाना क्र.६ मध्ये नमूद करण्यांत आलेल्या अटी/त्रुटींची देखील ०३ महिन्यांच्या आंत पूर्तता करावी व त्या पुष्ठ्यर्थ आवश्यक त्या कागदपत्र/दस्तऐवजांच्या साक्षांकीत प्रती जोडून अटी-पूर्तता अहवाल दोन प्रतीत संलग्नता विभागास सादर करावा, ही विनंती.आपणांस असेही कळविण्यांत येते की,विहीत मुदतीत अटी पूर्तता अहवाल सादर न केल्यास त्यास आपण सर्वस्वी जबाबदार रहाल.याची कृपया नोंद घेऊन कार्यवाही करण्यांत यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

(ग. ना. पवार)
उपकुलसचिव, संलग्नता विभाग

<u>प्रत माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव :-</u>

१) मा. अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई.
२) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे.
३) मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगांव विभाग, आकाशवाणी केंद्राच्या शेजारी, महाराष्ट्र राज्य जीवन प्राधिकरण इमारत, पहिला मजला, जळगांव.
४) मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, कवचौ उमवि, जळगांव
५) मा. पध्दती विश्लेषक, संगणक विभाग, परिक्षा विभाग, कवचौ उमवि, जळगांव.
६) उपकुलसचिव / सहा. कुलसचिव, प्रवेश पात्रता विभाग, कवचौ उमवि, जळगांव
७) सहा. कुलसचिव, व्याख्याता मान्यता विभाग, कवचौ उमवि, जळगांव.
८) समन्वयक विद्यार्थी सहायता ई सुविधा केंद्र, कवचौ उमवि, जळगांव